पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**<u>कार्यपत्रिका क्रमांक २०</u>**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १८/८/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **<u>स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे दृक श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे भरेल.</u>**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**<u>वृत्तांत कायम करणे.</u>**

**घनकचरा व्यवस्थापन आढावा**

**विषय क्र. ४०६**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/७/२०२० ते दि.३१/७/२०२० अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह.महा.आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांचे जा.क्र.घकव्यका/१४७६ दि. ४/८/२०२० चे पत्र.

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. ४०७**

क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरुड–बावधन क्षेत्रिय कार्यालयांच्या माहे जून २०२० चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/२२० दि.१०/८/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ४०८**

क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरुड–बावधन क्षेत्रिय कार्यालयांच्या माहे मार्च २०२० चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/२२१ दि.१०/८/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ४०९**

क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरुड–बावधन क्षेत्रिय कार्यालयांच्या माहे मे २०२० चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/२२३ दि.१०/८/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ४१०**

क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरुड–बावधन क्षेत्रिय कार्यालयांच्या माहे एप्रिल २०२० चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/२२४ दि.१०/८/२०२० चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ४११**

मा.श्रीमती रंजना टिळेकर यांचे दि.११/८/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र. ४१ कोंढवा बु. स.नं. ५६ मधून जाणाऱ्या ८४ मी.डी.पी. रस्त्यापासून स.नं. ५० मधील २४ मीटर डी.पी. रस्त्याकडे जाणारा वहिवाटीचा रस्ता स.नं. ५० मध्ये असलेल्या आरक्षणमधून कलम २१० अन्वये आखण्यात यावा.

**विषय क्र. ४१२**

मा.अरविंद शिंदे यांचे दि.१२/८/२०२० चे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र. ४११ दि.११/८/२०२० चा फेरविचार करण्यात येवून मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्र दप्तरी दाखल करण्यात यावे.

**विषय क्र. ४१३**
मा.अरविंद शिंदे यांचे दि.१२/८/२०२० चे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र. ४१० दि.११/८/२०२० चा फेरविचार करण्यात येवून मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्र दप्तरी दाखल करण्यात यावे.

**विषय क्र. ४१४**
मा.अरविंद शिंदे यांचे दि.१२/८/२०२० चे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र. ४०९ दि.११/८/२०२० चा फेरविचार करण्यात येवून मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्र दप्तरी दाखल करण्यात यावे.

**सेवकवर्गाची प्रकरणे**

**विषय क्र. ४१५**

पुणे महानगरपालिकेच्या कोथरुड बावधन क्षेत्रिय कार्यालयाकडे कामास असलेले श्री.मल्हारी आत्माराम जाधव, हुद्दा–ड्रेनेज बिगारी यांच्या निलंबन कालावधीस दि. १०/६/२०२० रोजी तिसरी सहामाही पूर्ण झाली असल्याने मनपा सेवाविनियम क्र. ५८ नुसार सदर बाब निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/साप्र/२२५ दि. १०/६/२०२० चे पत्र.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. ४१६**

मिळकतकराची थकबाकी वसूल होण्यासाठी व पालिकेचे उत्पन्न वाढीसाठी मिळकत कर अभय योजना राबविणेबाबत मा.ॲड्.अविनाश साळवे यांचे दि.२०/११/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १५९० दि. २६/११/२०१९, मा.विशाल धनवडे व मा.प्रमोद ओसवाल यांचे दि.६/२/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २४७१ दि. १४/२/२०१९, मा.ॲड्.अब्दुल गफुर अहंमद पठाण यांचे दि.१५/१/२०२० चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २०६९ दि. २१/१/२०२० ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टीजीओ/११३० दि.२४/२/२०२० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. १६/६/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ४१७**
मा.दिपक मानकर व मा.भैय्यासाहेब जाधव यांचे दि. ७/१/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिकेचा मिळकत कर वेळेत न भरल्यास प्रतिमहा २ टक्के दंड आकारला जातो. म्हणजेच एका वर्षात २४ टक्के इतका दंड आकारला जातो. दंडाची ही रक्कम जाचक असून नागरिकांकडून दंडाची रक्कम कमी करणेबाबत अनेकवेळा मागणी केली जाते. पुणे महानगरपालिकेकडून पूर्वी मिळकत कराची अभय योजना राबवून दंडाच्या रकमेतून सूट देण्यात आली होती. यावेळी पुणे महानगरपालिकेस कोटयावधी रूपयांचे उत्पन्न मिळाले होते. वास्तविक मिळकत कराची पावती प्राप्त न झाल्याने अनेक नागरिकांकडून मिळकत कर वेळेत भरला जात नाही. तद्नंतर दंडाची जाचक रक्कम मिळकत करात समाविष्ट होवून मिळकत कराची रक्कम जास्त असल्याने गोरगरीबांना सदर रक्कम भरणे शक्य होत नाही. पर्यायाने दंडाची रक्कम वाढत जाते. सद्यस्थितीत नवी मुंबई महानगरपालिकेने मिळकत कराबाबत अभय योजना राबविली असून त्याच धर्तीवर पुणे महानगरपालिकेने मिळकत कराबाबत अभय योजना राबवावी.

सबब गोरगरीब नागरिकांसाठी निवासी मिळकत कराबाबत पुणे महानगरपालिकेने अभय योजना राबवावी.
(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. १६/६/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ४१८**

पुणे शहरातील घरोघरी निर्माण होणाऱ्या वर्गीकृत कचऱ्याचे संकलन करणेकामी स्वच्छ सेवा सहकारी संस्था मर्यादित या संस्थे अंतर्गत कार्यरत कचरा वेचकांस कोविड आजाराच्या अनुषंगाने अतिरिक्त प्रोत्साहन भत्ता देणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घन.व्य./१४० दि.२५/६/२०२० चे पत्र.

१) वस्ती पातळीवरील दारोदारी कचरा संकलन करणाऱ्या कचरा वेचकांस महानगरपालिकेमार्फत प्रत्येक घरामागे देण्यात येणारा प्रोत्साहन भत्ता हा १० रु. ऐवजी २० रुपये प्रती घर प्रति महिना याप्रमाणे सहा महिने कालावधीकरीता अदा करणेस

२) हा प्रोत्साहन भत्ता पुनर्वसन केलेल्या झोपडपट्ट्या (SRA) तसेच अघोषित झोपडपट्टी क्षेत्रासही लागू करणेस
३) वेळोवेळी आढावा घेऊन धोरणात बदल/आवश्यक ते बदल करण्याचा अधिकार महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस
४) स्वच्छ सहकारी संस्थेचे कामकाज समाधानकारक नसल्यास या संस्थेला पुणे महानगरपालिकेमार्फत देण्यात येणारी मदत तात्काळ थांबविण्यात येईल व पर्यायी व्यवस्था करण्यात येईल व याबाबतचा निर्णय घेण्याचा व पर्यायी व्यवस्था करणेचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ११/८/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ४१९**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क मधील तरतूदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणू प्रतिबंधक उपाययोजने अंतर्गत उद्भवलेल्या आपत्कालिन परिस्थितीमध्ये पुणे मनपा हद्दीत लागण झालेल्या रुग्णांच्या व संशयित रुग्णांच्या मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तकत्यामधील अ.क्र. १ ते १२ नुसार क्वारंटाईन कक्षामध्ये एकूण र.रुपये ५७,७५,८२२=९६ पर्यंत केलेल्या विद्युत विषयक कामांची देयके आदा करणेस व त्यानुसार आवश्यकतेनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्यात आलेली असून सदरची बाब मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/विद्युत/१८२ दि.२१/७/२०२० चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ११/८/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ४२०**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क मधील तरतूदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणू प्रतिबंधक उपाययोजने अंतर्गत उद्भवलेल्या आपत्कालिन परिस्थितीमध्ये पुणे मनपा हद्दीत लागण झालेल्या रुग्णांच्या व संशयित रुग्णांच्या डॉ.नायडू हॉस्पीटल येथे करण्यात आलेल्या मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तकत्यामधील अ.क्र. १ ते २ नुसार विद्युत विषयक कामांची एकूण र.रुपये २७,९६,९०२=६३ पर्यंत केलेल्या विद्युत विषयक कामांची देयके आदा करणेस व त्यानुसार आवश्यकतेनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्यात आलेली असून सदरची बाब मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/विद्युत/१८३ दि. २१/७/२०२० चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ११/८/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

**सुचना – कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सअॅप द्वारे कळविण्यात येईल.**